
शुभ दीपावली
दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
● वर्ष १ ले ● अंक १७० वा ● शुक्रवार १० नोव्हेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 170 | Date : 10/11/2023 | blow :Friday | Page 4 | Price 4

## डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात संसदेचं हिवाळी अधिवेशन..

### ‘ही’ विधेयकं सादर होण्याची शक्यता

नवी दिल्ली : संसदेचं हिवाळी अधिवेशनाच्या तारखा लवकरच समोर येऊ शकतात. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरू होण्याची शक्यता असल्याचं बोललं जात आहे. तसेच, ख्रिसमसपूर्वी हिवाळी अधिवेशन आटोपलं जाणार असल्याच्याही चर्चा सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ डिसेंबर रोजी पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणी पार पडणार आहे. मतमोजणीनंतर काहीच दिवसांत संसदेचं हिवाळी अधिवेशन बोलावलं जाऊ शकतं, तर ख्रिसमसपूर्वी



अधिवेशन आटोपलं जाणार असल्याचीही माहिती मिळतेय. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात प्रमुख फौजदारी कायद्यांच्या जागी तीन महत्त्वाच्या विधेयकांवर विचार होण्याची शक्यता आहे. गृहविभागाच्या स्थायी समितीनं नुकताच तीन विधेयकांवरील अहवाल स्वीकारला आहे. हिवाळी अधिवेशन सामान्यतः नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू होतं आणि ख्रिसमसच्या (२५ डिसेंबर) आधी संपतं. पण । पान २ वर

## अजित पवार गटाकडून २० हजार बोगस कागदपत्रे

### शरद पवार गटाचा निवडणूक आयोगात दावा



नवी दिल्ली: राष्ट्रवादी पक्ष कुणाचा याची गुरूवारची सुनावणी संपली असून आता पुढील सुनावणी २० नोव्हेंबर रोजी होणार आहे. अजित पवार गटाकडून सुमारे २० हजार बोगस शपथपत्रकं दाखल करण्यात आल्याचा आरोप शरद पवार गटाने केला आहे. यातील काही शपथपत्रं ही अल्पवयीन मुलांच्या नावावर असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. शरद पवार गटाकडून ३० ऑक्टोबरला निवडणूक आयोगात मोठ्या प्रमाणात पुरावे सादर केले आहेत. राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हावर अजित पवार गटाने दावा केल्यानंतर हा वाद निवडणूक आयोगात पोहोचला आहे. त्याची गुरूवारची सुनावणी । पान २ वर

### राष्ट्रवादीतल्या चिन्हाच्या लढाईचा घटनाक्रम

- २ जुलै रोजी अजित पवार गटाचा शपथविधी
- शरद पवार गटाकडून निवडणूक आयोगात ५ जुलै रोजी कॅव्हिएट दाखल
- अजित पवार गटानं ३० जून रोजीच झालेल्या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अजित पवारांची निवड झाल्याचा दावा केला, ४० आमदार आपल्या बाजूनं असल्याचाही दावा
- निवडणूक आयोगानं त्यावर दोन्ही बाजूंना नोटीसा देत ८ सप्टेंबर पर्यंत आपली बाजू मांडण्यास सांगितलं
- दोन्ही बाजूची कागदपत्रं पाहिल्यानंतर आयोगानं आता या सुनावणीसाठी ६ ऑक्टोबर ही तारीख दिली होती.
- अजित पवार गटाने २० हजार बोगस कागदपत्रे जमा केल्याचा आरोप शरद पवार गटाने केला आहे.

## मराठा व ओबीसी समाजांना न्याय देण्याचा राज्यकर्ते म्हणून आमचा प्रयत्न : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे : मराठा व ओबीसी अशा दोन्ही समाजांना न्याय देण्याचा राज्यकर्ते म्हणून आमचा प्रयत्न राहणार आहे. तथापि, महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा बिघडणार नाही, याची खबरदारी राजकीय तसेच समाजाच्या नेत्यांचीही घेतली पाहिजे, असा सल्ला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी येथे दिला. पुण्यात आल्यानंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे की, मराठा आरक्षण देण्याच्या संदर्भात राज्य सरकारची कमिटमेंट आहे. ती आमची भूमिका आहे. त्याच्यावर जी काही कार्यवाही करायची आहे, ती आम्ही सुरू केलेली आहे. त्याला जो काही कायदेशीर वेळ द्यावा लागेल, तो वेळ आम्ही देऊ. याशिवाय ओबीसी



समाजानेदेखील कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे. शेवटी राज्यकर्ते म्हणून प्रत्येक समाजाला न्याय देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. कुठेही दोन समाज एकमेकांसमोर उभे आहेत, अशा प्रकारे महाराष्ट्राचा सामाजिकसलोखा बिघडणार नाही, हा प्रयत्न आम्हाला करावा लागणार आहे. ही केवळ आमची नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीची, नेत्याची जबाबदारी आहे. राजकीय असो वा । पान २ वर

## एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड, कर्मचारी–अधिकाऱ्यांना ६००० रुपयांचा बोनस जाहीर

मुंबई : एसटी कर्मचारी आणि अधिकारी यांना सरसकट ६००० रुपयांचा सानुग्रह बोनस जाहीर करण्यात आलाय. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी आता गोड होणार असल्याचं म्हटलं जातंय. मंत्री उदय सामंत यांनी यासंदर्भात माहिती दिलीये. मागील अनेक महिन्यांपासून तोट्यात असणाऱ्या एसटीची आर्थिक स्थिती काही प्रमाणात सुधारत असल्याचं चित्र आहे. त्यातच एसटी कर्मचाऱ्यांसाठी काही महत्त्वपूर्ण निर्णय देखील शासनाकडून घेण्यात आले आहेत. तसेच एसटी महामंडळास स्व–मालकीच्या गाड्या खरेदी करण्यासाठी यंदाच्या वर्षी ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची माहिती देण्यात आलीये.

मंत्री उदय सामंत आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांसोबत बैठक पार पडली या बैठकीमध्ये काही महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार खात्याअंतर्गत बढतीसाठी



आवश्यक असणारी २४० दिवसांची अट रद्द होईपर्यंत सदर बढतीस स्थगिती देण्यात येईल. त्याचप्रमाणे सातवा वेतन आयोगानुसार वेतन देण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२३ पूर्वी सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाशी बैठक घेऊन निर्णय देण्यात येईल.

या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आलीये. कॅशलेस मेडिक्लेम योजनेसाठी तालुका आणि जिल्हास्तरावर रुग्णालयांची निवड करण्यात येईल. या रुग्णालयामध्ये एसटी कर्मचाऱ्यांची बिले महामंडळ देय करणार आहे. त्याचप्रमाणे घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, वेतन वाढीचा दराची थकबाकीबाबत ३० नोव्हेंबरपूर्वी निर्णय घेण्यात येईल.

दरम्यान गुणरत्न सदावर्ते यांनी काही दिवसांपूर्वी एसटी कर्मचाऱ्यांना सातवे वेतन आयोग लागू करण्यासाठी एसटी बंदची हाक दिली होती. परंतु त्यांच्या या हाकेला फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याचं चित्र होतं. मात्र आंदोलनावर भाष्य करताना सदावर्ते । पान २ वर

## जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागाची कारवाई

सोलापूर/प्रतिनिधीः सणासुदीच्या कालावधीमध्ये नागरिकांना दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने जिल्ह्यात विविध ठिकाणी धडक कारवाई करुन माल जप्त केला आहे. दि. ३१ ऑगस्ट ते दि. ०७ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत तेल व वनस्पती- तेलाचे एकूण ५ नमुने व वनस्पतीचे २ नमुने, दूध या अन्न पदार्थाचे ५५ नमुने व दुग्धजन्य पदार्थाचे १८ नमुने, रवा, मैदा, आटा व इतर असे एकूण २२ नमुने तसेच तुप, खवा, पनीर- या अन्न पदार्थाचे एकूण ११ नमुने विश्रृलेषणासाठी घेण्यात आले असल्याचे अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त सु. द. जिंतूरकर यांनी सांगितले आहे.

या मोहिमेत दि. १८ सप्टेंबर २०२३ रोजी बेगमपुर (ता. मोहोळ) येथील मे. बॉम्बे स्विट मार्ट व बेकरी या ठिकाणी धाड टाकून स्पेशल । पान २ वर

### राज्यभरात अवकाळीची अवकृपा!

## ऐन दिवाळीत खरेदीसाठी घराबाहेर पडलेल्यांची तारांबळ

मुंबई : ऐन दिवाळीत मुंबई, ठाणे, कल्याण, नवी मुंबईत अवकाळी पावसानं हजेरी लावली. दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. मात्र अचानक आलेल्या पावसामुळे सर्वांची चांगलीच तारांबळ उडाली. कल्याण डोंबिवलीसह कळवा, मुंब्रा, ठाणे आणि ग्रामीण परिसरात वाऱ्यासह अवकाळी पाऊस बरसला. तर मुंबई उपनगरातही पावसाने जोरदार हजेरी लावली. अवकाळी पावसामुळे मुंबईकरांची तारांबळ उडाली.

मुंबई उपनगरात अचानक पावसानं जोरदार हजेरी लावली आहे. पूर्व उपनगरात घाटकोपर, विक्रोळी, भांडुप , मुलुंड, गोवंडी अशा सर्वच परिसरात जोरदार पाऊस कोसळला आहे. या अवकळी पावसानं मुंबईकरांची भलतीच तारांबळ उडाली आहे. सुमारे अर्ध्या तासापासून जोरदार पाऊस कोसळत होता. यामुळे दिवाळी साठी खरेदीला किंवा भेटी गाठी घेण्यास बाहेर पडलेल्या मुंबईकरांची मोठी तारांबळ उडाली होती.

सुमारे अर्ध्या तासापासून मुंबईसह परिसरात जोरदार पाऊस कोसळला. यामुळं दिवाळीसाठी खरेदीला किंवा भेटीगाठी घेण्यास बाहेर पडलेल्या मुंबईकरांची मोठी तारांबळ उडाली. नवी मुंबऊतही जोरदार पाऊस पडला. नवी मुंबईतील ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे भागात जोरदार पाऊस पडला. अचानक पडलेल्या पावसामुळं लोकांची तारांबळ उडाली. कल्याण डोंबीवलीसह कळवा, मुंब्रा, ठाणे आणि । पान २ वर






**महाराष्ट्र राहून कर्नाटकचा हेरगिरी करणारा शिपाई, मराठी लोकांना फसवणूक करून, मयताच्या टाळू वरचे लोणी खाणारा मलिनाथ करपे यांची कारनामे लवकरच वाचा ......**

# कारागिरांनो प्रधानमंत्री विश्र्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेचा घ्या लाभ

देशाचे प्रधानमंत्री मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी गावातील बलुतेदारांना त्यांच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळावे, त्यांचे कौशल्य आणखी वाढावे, यासाठी प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना सुरू करण्याची घोषणा केली होती. कारागिरांच्या विकासासाठी ही नवीन योजना सुरू करण्यात आली आहे. देशातील बेरोजगारी कमी करणे आणि गरीब कारागिरांना अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे हा या योजनेचा उद्देश आहे. ही योजना पारंपारिक कौशल्य असलेल्या लोकांना त्यांचा व्यवसाय उभारण्यास मदत करेल. या योजनेत लोकांना केवळ कर्जच मिळणार नाही तर कौशल्य प्रशिक्षणही मिळणार आहे. लोहार, सोनार, कुंभार, सुतार आणि मोची यांसारखी पारंपारिक कौशल्ये असलेल्या लोकांना पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा लाभ मिळेल. अशा १८ पारंपरिक कामांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत कारागिरांना आधुनिक साधनांचे प्रशिक्षण दिले जाईल आणि या प्रशिक्षणादरम्यान ५०० रुपये भत्ता दिला जाईल. यासोबतच, प्रशिक्षण पूर्ण केल्यावर, उपकरणे खरेदी करण्यासाठी १५ हजार रुपयांपर्यंतची मदत देखील दिली जाणार आहे.

**पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेचे फायदे**

आर्थिक मदत

जगभरातील बाजारपेठांमध्ये प्रवेश असेल

वाणिज्य आणि उद्योजकता मंत्रालयाशी संबंधित

नवीनतम तांत्रिक प्रगतीमध्ये प्रवेश

प्रगत कौशल्य प्रशिक्षण

**प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेसाठी पात्रता**

स्वयंरोजगाराच्या आधारावर असंघटीत क्षेत्रात हात आणि साधनांनी काम करणारा आणि योजनेतील १८ व्यवसायापैकी कुटुंब आधारित पारंपारिक कारागिर नोंदणीसाठी पात्र असेल. प्रत्येक कुटुंबातील एका सदस्यालाच लाभ मिळेल. कुटुंब म्हणजे पती, पत्नी आणि अविवाहित मुले होय. लाभार्थीचे वय नोंदणीच्या तारखेला १८ वर्षे किंवा त्याहून अधिक असावे.

जर एखाद्याला योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्याला त्याच व्यवसायात काम करावे लागेल, ज्यामध्ये त्याने नोंदणीवेळी व्यवसाय करण्याची माहिती दिली होती. मागील ५ वर्षात स्वंयरोजगार तथा व्यवसाय विकासासाठी इतर योजनांतर्गत कर्ज घेतले नसावे. (उदा. केंद्र, सरकार किंवा राज्य सरकारचे पीएमईजीपी / सीएमईजीपी तथापी मुद्रा ) पीएम स्वनिधीचे लाभार्थी ज्यांनी त्यांच्या कर्जाची परतफेड केली आहे, ते प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत पात्र असतील. सरकारी सेवेत कार्यरत असलेले लोक आणि त्यांचे कुटुंबीय या योजनेंतर्गत पात्र असणार नाहीत.

**प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेचे लाभ/ फायदे**

यशस्वी नोंदणी आणि पडताळणीनंतर लाभार्थीला पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र आणि ओळखपत्र दिले जाईल. कौशल्य पडताळणीनंतर पाच दिवसीय बेसिक प्रशिक्षण व १५ दिवसीय प्रगत प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण कालावधीत दररोज प्रत्येक प्रशिक्षणार्थीना ५०० रुपये विद्यावेतन मिळणार आहे. त्यानंतर प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या कारागिरांना टूलकिट (व्यवसाय साहित्य) खरेदीसाठी १५ हजार रुपयांचे ई-व्हाऊचर दिले जाईल. मूलभूत कौशल्य प्रशिक्षणानंतर लाभार्थी योजनेच्या लाभासाठी पात्र होईल. पहिल्या टप्पयात ५ टक्के व्याजासह १८ महिन्यांच्या परतफेडीच्या कालावधीसह १ लाखापर्यंतचे तारणमुक्त कर्ज मिळेल. दुसऱ्या टप्प्यात प्रगत कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या, तसेच डिजिटल व्यवहार स्वीकारलेल्या कारागिरांना १८ महिन्यांच्या परतफेडीच्या कालावधीसह २ लाखापर्यंत तारणमुक्त कर्ज मिळेल. डिजिटल व्यवहारास प्रोत्साहन, लाभार्थीना जास्तीत जास्त १०० व्यवहारांसाठी मासिक प्रती व्यवहार एक रुपया प्रोत्साहनपर मिळेल. मार्केटिंग सहाय्य प्रचार-प्रसिध्दी, गुणवत्ता प्रमाणीकरण, ब्रँडिंग व प्रदर्शने यासाठी त्यांना वेगवेगळ्या शासकीय यंत्रणांचे सहकार्य लाभेल.

**या कारागिरांचा योजनेत समावेश**

सुतार, होड्या बनवणारे, हत्यारे बनवणारे, लोहार, टाळा बनवणारे, हातोडा आणि टूलकिट बनविणारे, सोनार, कुंभार, मूर्तीकार, चांभार, मेस्त्री, चटई आणि झाडू बनवणारे, पारंपारिक बाहुल्या आणि खेळणी बनविणारे, न्हावी, हार बनविणारे, धोबी, शिंपी, माशाचे जाळे या कारागिरांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

**अशी करा नोंदणी**

ग्रामीण भागातील सुविधा केंद्रावर (सीएससी) आपली माहिती भरून नोंदणी करावी. ही माहिती गावाचे सरपंच तपासून योग्य असलेल्या उमेदवारांची माहिती व अर्ज जिल्हा समितीकडे पाठवितात. जिल्हास्तरीय समिती या यादीतील कारागिरांना प्रशिक्षणासाठी निवड केली जाते.

जास्तीत जास्त कारागिरांनी योजनेचा लाभ घ्यावा - जिल्हाधिकारी

ठाणे जिल्ह्यातील खेड्यापाड्यातील कारागिरांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचा लाभ घेऊन आपले कौशल्य विकसित करावे. आपले जीवनमान उंचावून कौशल्य विकसित करावे. जिल्ह्यातून मोठ्या संख्येने विश्वकर्मा कारागिर निर्माण व्हावे, यासाठी जास्तीत जास्त कारागिरांनी सामूहिक सुविधा केंद्रावर नोंदणी करावी, असे आवाहन ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

- नंदकुमार वाघमारे, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे

## संपादकीय

### सरकारची कोंडी..

राजकीय धुळवडही सुरू झाली आहे. सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांना घेरण्यासाठीही अनेक मार्ग अवलंबले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांना घेरण्यासाठी महादेव ॲपचे एक प्रकरण पुढे आणले गेले आहे. हे बेटिंग म्हणजेच सट्टेबाजीचे ॲप आहे. त्या ॲपच्या मालकांकडून छत्तीसगडच्या मुख्यमंत्रांनी ५०८ कोटी रुपयांची रक्कम वसूल केली असल्याचा आरोप केला जात आहे. हे एक अत्यंत रंजक प्रकरण आहे. त्यावर काँग्रेस व छत्तीसगडच्या मुख्यमंत्र्यांनी जो पलटवार केला आहे त्याचा तपशील वाचल्यानंतर हे भाजपवरच बुमरँग ठरण्याची शक्यता अधिक दिसत आहे. या संबंधात काँग्रेसच्या गोटातून असे सांगण्यात आले आहे की या ॲपवर बंदी घालावी, अशी मागणी २३ ऑगस्ट रोजी भूपेश बघेल यांनीच काँग्रेस मुख्यालयात एक पत्रकार परिषद घेऊन केली होती. एवढेच नव्हे तर या ॲपशी संबंधित इसमांवर छत्तीसगड पोलिसांनी गुन्हे दाखल करून त्यांची कोट्यवधी रुपयांची मालमत्ताही जप्त केली होती. या ॲपच्या मालकांच्या विरोधात छत्तीसगड पोलिसांनी लूकआउट नोटीसही जारी केल्याची माहिती काँग्रेसकडून देण्यात आली आहे; परंतु केंद्र सरकारने या ॲपवर बंदी घातली नाही. उलट बेटिंग ॲपवर २८ टक्के जीएसटी लागू करून बेटिंग ॲपला अधिकृत वैधताच देण्याचा प्रयत्न केला, असेही काँग्रेसचे म्हणणे आहे. या ॲपचे मालक दुबईत राहात असले तरी ते मूळचे छत्तीसगडचे रहिवासी आहेत आणि त्यांच्याविरोधात छत्तीसगड पोलिसांनी पहिली तक्रार नोंदवली असल्याने त्यांना दुबईतून ताब्यात घेऊन आमच्या ताब्यात द्यावे, अशी मागणीही बघेल यांनी केली आहे. त्यांची ही भूमिका केंद्र सरकारलाच आव्हान देणारी ठरली आहे. केंद्रातले एक मंत्री राजीव चंद्रशेखर हे आयटी खात्याशी संबंधित मंत्री आहेत. त्यांनी या प्रकरणात असा उफराटा सवाल केला आहे की जर महादेव ॲप हे बेकायदेशीर बेटिंग करीत आहे तर त्यावर छत्तीसगड सरकारनेच का बंदी घातली नाही. वास्तविक या मंत्री महोदयांना माहिती असायला हवे की अशा प्रकारच्या विदेशातून चालणाऱ्या ॲपवर बंदी घालण्याचा अधिकार केंद्र सरकारचाच असतो आणि राज्य सरकारने शिफारस करूनही त्या ॲपवर बंदी घालण्यास केंद्रानेच वेळकाढूपणा केला आहे. ही वस्तुस्थिती लक्षात न घेता मंत्रिमहोदय ही जबाबदारी राज्य सरकारवर ढकलू पाहात आहेत. यावरूनच यातील गौडबंगाल लक्षात येण्यास हरकत नाही. एकूणच या प्रकरणावरुन केंद्रातील मोदी सरकारची कोंडी झाली आहे.

पान १ वरुन

### डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात

यावेळी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात हिवाळी अधिवेशन सुरू होण्याची शक्यता आहे.

संसदेत प्रलंबित असलेले दुसरं मोठं विधेयक मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीशी संबंधित आहे. पावसाळी अधिवेशनात मांडण्यात आलेलं हे विधेयक विरोधी पक्ष आणि माजी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधानंतर संसदेच्या विशेष अधिवेशनात मंजूर करण्यासाठी सरकारनं आग्रह धरला नाही. या विधेयकाद्वारे सरकारला मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्तांचा दर्जा कॅबिनेट सचिवांच्या बरोबरीनं आणायचा आहे. सध्या त्यांचा दर्जा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या समकक्ष आहे.

संसदेचं हिवाळी अधिवेशन साधारणतः नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात सुरू होतं आणि ख्रिसमसच्या सुट्ट्यांपूर्वी आटोपलं जातं. परंतु, यंदा अधिवेशनाबाबत कोणतीही माहिती अद्याप केंद्र सरकारकडून देण्यात आलेली नाही. त्यामुळे यंदा अधिवेशन कधी? अशा चर्चा सुरू आहेत. अशातच यंदा संसदेचं हिवाळी अधिवेशन डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुरू होऊन ख्रिसमसपूर्वी आटोपलं जाऊ शकतं, असं बोललं जात आहे.

### अजित पवार गटाकडून ..

संपली आहे. शरद पवार गटाकडून युक्तिवाद करताना वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी अजित पवार गटाने २० हजार बोगस कागदपत्रे असल्याचा दावा केला आहे. त्यामधील अनेक कागदपत्रं ही अल्पवयीन मुलांच्या नावावर असल्याचा दावाही शरद पवार गटाने केला आहे.

अजित पवार गट सत्तेत सामील झाल्यामुळे राष्ट्रवादीत दोन गट पडले आहेत. सत्तेत सामील झाल्यानंतर अजित पवार गटाने राष्ट्रवादी पक्षावर आणि घड्याळ चिन्हावर दावा केला आहे. अजित पवार गटाने पक्षावर दावा केल्यामुळे शरद पवार गटानेही आक्रमक भूमिका घेतली आहे. यामुळे हे प्रकरण केंद्रीय निवडणूक आयोगात पोहोचलं आहे. या प्रकरणावर सुरू असलेल्या सुनावणीकडे साऱ्यांचं लक्ष लागलं आहे. गेल्या महिन्यात झालेल्या सुनावणीदरम्यान शरद पवार यांची अध्यक्षपदी झालेली नियुक्ती पक्षाच्या घटनेला धरून नसल्याचा युक्तिवाद अजित पवार गटाने केला होता.

निवडणूक आयोगात अजित पवार गटाकडून नीरज कौल आणि मणिंदर सिंग हे बाजू मांडत आहेत. तर शरद पवार गटाकडून अभिषेक मनू सिंघवी आणि देवदत्त कामत बाजू मांडत आहेत. गेल्या सुनावणीमुळे अजित पवार गटाकडून पी.ए. संगमा, सादिक अली या दोन्ही केसचा दाखला देण्यात आला होता. यासोबतच शिवसेनेतील सत्ता संघर्षाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या निकालाचाही उल्लेख वारंवार केला होता.

### मराठा व ओबीसी समाजांना न्याय..

समाजाचे नेते असोत. प्रत्येकाला महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा बिघडणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. तशा प्रकारची विधाने वा वर्तनाबाबत प्रत्येकालाच काळजी घ्यावी लागेल. ललित पाटील प्रकरणाबाबतच्या गोष्टी मी स्पष्टपणे सांगितल्या आहेत आणि त्याला कुणी संरक्षण दिले, हेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यासंदर्भात आता त्यांना बोलायलाच जागा राहिलेली नाही. त्यांनी वा अन्य कुणीही याबाबत कोणतीही तक्रार केली असेल, व्हिडिओ ट्विट केला असेल, तर त्याची सत्यता पडताळून कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले.

### एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी ..

म्हणाले, आंदोलन सुरू करण्याआधी या सरकारने आम्हाला चर्चेसाठी बोलवलंय. त्याचप्रमाणे या संपात मोठ्या प्रमाणावर कर्मचारी आणि कामगार सहभागी होणार असल्याचा दावा करण्यात येत होता. परंतु तो दावाही फोल ठरल्याचं पाहायला मिळालं.

जवळपास दोन वर्षांपूर्वी एसटी महामंडळाचे विलिनीकरण, सातवा वेतन आयोग, आदींसह विविध मागण्यांसाठी संप पुकारण्यात आला होता. एसटी कर्मचाऱ्यांच्या या उत्स्फुर्त संपात गुणरत्न सदावर्ते यांनी उडी घेतली. या संपानंतर एसटी कर्मचाऱ्यांची संघटना त्यांनी सुरू केली. पण आता एसटी कर्मचाऱ्यांबाबत अनेक सकारात्मक निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात येत असल्याचं चित्र आहे. त्यामुळे यंदाची एसटी कर्मचाऱ्यांची दिवळी गोड होणार असल्याचं म्हटलं जातंय.

### जिल्ह्यात अन्न व औषध

बर्फी- ४० किलो, सुमारे १० हजार रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे.दि. १० ऑक्टोबर २०२३ रोजी मे. उत्तम चौधरी, भवानी पेठ, सोलापूर या ठिकाणी धाड टाकून स्पेशल बर्फी- ६८ किलो, किंमत रु. १७ हजार रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आलेला आहे . दि. १६ ऑक्टोबर २०२३ रोजी टेंभुर्णी (ता.माढा) येथील मे. भगवान राम पालिवाल या पेढीवर धाड टाकून स्पेशल बर्फी- १०३ किलो, किंमत २५ हजार ७५० रुपयाचा साठा जप्त करण्यात आलेला आहे. तसेच दि. ०२ नोव्हेंबर २०२३ रोजी मु. पो. कोंढारपट्टा (माळशिरस) येथील मे. शौर्य गुळ उद्योग या ठिकाणी धाड टाकून गुळ व साखर (अपमिश्रक)- ९१८ किलो, किंमत ३५ हजार १२५ रुपयाचा चा साठा जप्त करण्यात आलेला आहे.दि. ०७ नोव्हेंबर २०२३ रोजी टेंभुर्णी (ता.माढा) येथील मे. ध्रुव एजन्सी या ठिकाणी धाड टाकून दुध भेसळीसाठी वापरण्यात येणाऱ्या विविध कंपनीचे व्हे पावडरचे एकूण १ हजार ८१३ किलो सुमारे १ लाख ५९ हजार ६४० किंमतीचा साठा जप्त करण्यात आला असल्याचे अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त सु. द. जिंतूरकर यांनी सांगितले


### ऐन दिवाळीत खरेदीसाठी

ग्रामीण परिसरात वाऱ्यासह अवकाळी पावसाला सुरुवात झाली आहे. या पावसामुळं हवेत गारवा निर्माण झाला आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक भागात सलग चौथ्या दिवशी पावसाने हजेरी लावली. विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस झाला. कापणीला आलेल्या भात शेतीला या पावसाचा फटका बसला. दरम्यान किनारपट्टी भागाची तुलना करता सह्याद्रीच्या डोंगर रांगांमध्ये असलेल्या भागात पाऊस जास्त कोसळला. त्यामुळे त्याचा परिणाम वीज पुरवठ्यावरही झाला. अनेक भागात विजेचा लपंडाव देखील पाहायला मिळाला.

कल्याण डोंबिवली आणि परिसरामध्ये अचानकच अवकाळी पावसाने हजेरी लावली. सोसाट्याच्या वाऱ्यासह विजेच्या कडकडाटामध्ये कल्याण डोंबिवली परिसरात पावसानं हजेरी लावली आहे. पावसाबरोबरच सुसाट वारा येत असल्यानं कल्याणच्या पिसवली गावातील दहा घरांवर झाड कोसळल्यानं घरांचं नुकसान झालं आहे.

या घटनेत तीनजण जखमी झाले आहेत. कोसळलेल्या झाडाची तक्रार कल्याण महानगरपालिकेकडे स्थानिक रहिवाशांनी दिली होती. मात्र, महापालिकेनं वेळेत कारवाई न केल्यामुळं हा अपघात झाल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे.

## 'किशोर'च्या 'मूलभूत जीवन कौशल्य' दिवाळी अंकाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रकाशन




मुंबई : शालेय शिक्षण विभागांतर्गत बालभारतीच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या 'किशोर' मासिकाच्या 'मूलभूत जीवन कौशल्य' या दिवाळी अंकाचे प्रकाशन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण व मराठी भाषा विभागाचे मंत्री दीपक केसरकर, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, मुख्य सचिव मनोज सौनिक, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील, किशोरचे संपादक किरण केंद्रे आदी उपस्थित होते. मुलांना अवांतर वाचनाची गोडी लागावी, त्यांना पुस्तकाबाहेरील ज्ञान मिळावे,

त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि त्यांच्या कोवळ्या मनावर उत्तम मूल्यसंस्कार व्हावेत या उद्देशाने गेली ५२ वर्षे 'बालभारती'च्या वतीने 'किशोर' हे मासिक प्रकाशित केले जाते. 'किशोर'चा दिवाळी अंक हा नेहमीच आकर्षक आणि नाविन्यपूर्ण राहिला आहे. यंदाचा किशोरचा दिवाळी अंक 'मूलभूत जीवन कौशल्य' या विषयावर आधारलेला आहे. बालवयीन आणि किशोरवयीन मुले अंगभूत बळ, आत्मविश्वास, धाडस यांच्या आधारे संकटांना कशी सामोरी जाऊ शकतील, या प्रश्नाचा वेध कथा, कविता, लेख आणि खेळ अशा माध्यमांतून या अंकात घेण्यात आला आहे. किशोरच्या परंपरेनुसार अंकात अनेक मान्यवरांनी दर्जेदार आणि मनोरंजक लेखन केले आहे.

## 'मिशन महाग्राम' साठी आयडीबीआय बँकेकडून ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनला ११ कोटी ६२ लाखांचा निधी

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार, धनादेश सुपूर्द

मुंबई : 'मिशन महाग्राम' अंतर्गत ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन व आयडीबीआय बँक यांच्या दरम्यान आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार तसेच धनादेशाचे हस्तांतरण करण्यात आले. या 'मिशन महाग्राम' मध्ये आयडीबीआय बँकेच्या सहकार्याने राज्यातील १०४ गावांमध्ये पुढील ३ वर्षात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यासाठी बँक ११ कोटी ६२ लाख रुपयांचा निधी दिला आहे. तसेच विविध रोजगार निर्मिती व गावाच्या सर्वांगीण विकास कार्यात अग्रणी भागीदार म्हणून सहकार्य करणार आहे. यासाठीचा सामंजस्य करार करण्यात आला, तसेच बँकेकडून ११ कोटी ६२ लाखांचा धनादेश ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनसाठी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

यावेळी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन तसेच मंत्रिमंडळातील सदस्य मंत्रीगण यांच्यासह 'मित्रा' संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, तसेच आयडीबीआय बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी राकेश शर्मा, व्यवस्थापकीय संचालक श्रीमती बलजिंदरकौर मंडल आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासासाठी सन २०२२ ते २०२५ दरम्यान ग्राम सामाजिक




परिवर्तन अभियान- २ हे 'मिशन महाग्राम' म्हणून राबविण्यात येणार आहे. याबाबीचा अर्थसंकल्पातच समावेश करण्यात आला आहे. आयडीबीआय व ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन तर्फे राज्यातील ५ जिल्ह्यांमधील ८ तालुक्यांतील १०४ गावांमध्ये कृषी व कृषी संलग्न क्षेत्र, ग्रामीण गृह निर्माण क्षेत्र, ग्रामीण आरोग्य क्षेत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता व जलसंधारण क्षेत्र, शिक्षण क्षेत्र, उपजीविका क्षेत्र आणि विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर व कन्नड तालुके, जळगाव मधील जामनेर, पुणे जिल्ह्यातील बारामती व दौंड, सोलापूर मधील अक्कलकोट व पंढरपूर, आणि नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यांचा समावेश आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# संपूर्ण सोलापूर जिल्हा दुष्काळ म्हणून जाहीर करा : रिपाईची मागणी

सोलापूर/प्रतिनिधीः गतवर्षी पाऊसाचे प्रमाण खूपच कमी राहिले असून संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळच्या छायेत असून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील फक्त ४३ तालुके दुष्काळ ग्रस्त म्हणून जाहीर केले आहेत वास्तविकता वेगळी आहे शासनाच्या अटी आणी नियमाने संपूर्ण शेतकरी दुष्काळाने भरडाला जात आहे जिथे दुष्काळाची मदत भरले आहे सोलापूर कराचे पिण्याच्या पणीचे वांदे होणार आहेत होत आहेत आत्ताच सोलापुरातील कितातरी वाडी वस्तीला टँकर द्वारे पाणी पुरवठा केला जात आहे त्या मूळे शासनाने अटी आणी नियमाच्या पुढे जाऊन सोलापूर जिल्याचा विचार करून संपूर्ण सोलापूर जिल्हाच दुष्काळ ग्रस्त म्हणून जाहीर करून ताबडतोब जनावरे चा चर्याचा प्रश्न शेतकऱ्याच्या विद्यार्थी यांच्या मुलांना सवलती कर्ज वसुली स्थागित करणे चारा छावणी उघडणे अश्या अनेक प्रश्न शासनाने या निमताने सोडवावे अन्यथा



शासनाकडून पाहिजे तिथे न देता या अटी नियमामूळे दुष्काळ ग्रस्त शेतकऱ्यांना वंचित ठेवले जात आहे तीच परस्थिती सोलापूर जिल्याची आहे तसे पाहता सोलापूर हा पाहिलेपासूनच दुष्काळ ग्रस्त असल्या सारखे आहे आणी आता तरी कमी पाऊस पडल्या मूळे शेतकरी पुरता अर्धमेला झाला आहे गुरांना चारा पाणी आणी शेतीला पाणी तसेच या वर्षी उजनी धरण सुद्धा ६०%च रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने तीव्र आंदोलन करणार असल्याचे निवेदन निवासी उपजिलधिकारी कांबळे यांना देण्यात आले या वेळी प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे माणिक आठवले रावसाहेब साहेब परीक्षाळे श्रीमंत गायकवाड धर्मा माने सिकंदर शेख सलीम मुल्ला इब्राहिम शेख कल्लाप्पा बनसोडे संगीता क्षीरसागर अमिना शेख पूनम मोरे आदी पदाधिकारी उपस्थित होते

# सोलापूर महापालिकेकडून पाण्यासाठी महिला, महिलासाठी पाणी' अभियान राबविण्यात आले

सोलापूर/प्रतिनिधीः गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, सोलापूर महानगरपालिका, अमृत २.० अंतर्गत दि. ०७ नोव्हेंबर ते दि. ०९ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत जल दिवाळी साजरी करण्यासाठी सोलापूर महानगरपालिके कडून Women for water, Water for Women Campaign (पाण्यासाठी महिला, महिलांसाठी पाणी अभियान) हा उपक्रम राबविण्यात आला.




सोलापूर महानगरपालिके च्या माध्यमातून ०७ नोव्हेंबर २०२३ रोजी ५० महिलांना भवानी पेठ जलशुद्धीकरण येथे स्वयंसहाय्यता बचत गटामधील ( SHGs) महिलांना भेट देण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली होती. या भेटींमुळे त्यांना घरोघरी स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याच्या विविध प्रक्रियांची माहिती मिळाली. शिवाय, नागरिकांना उच्च-गुणवत्तेचे पाणी मिळेल याची खात्री करून घेणाऱ्या पाण्याच्या गुणवत्तेच्या चाचणी प्रक्रियेबद्दल त्यांना शिक्षित केले गेले. पाण्याच्या पायाभूत सुविधांबाबत महिलांमध्ये आपलेपणा आणि मालकीची भावना वाढवणे हा या भेटींचा मुख्य उद्देश होता. शिवाय या भेटींमुळे महिलांना मुलाखतींच्या माध्यमातून संवाद साधण्याची संधी निर्माण झाली,

सर्वसमावेशकता आणि सहभाग याला चालना मिळेल तसेच एकूणच गटांमधील महिलांचा अनुभव वाढविण्यासाठी, स्मृतीचिन्ह आणि महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू भेट म्हणून देण्यात आले. सोलापूर मनपा आयुक्त शीतल तेली उघले यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप कारंजे अतिरिक्त आयुक्त, शहर प्रकल्प अधिकारी तथा उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सार्वजनिक आरोग्य अभियंता विजय राठोड यांच्या सूचनेनुसार शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलानी, गिरीश तंबाके , उज्वला गणेश, शहर अभियान व्यवस्थापन कक्षातील सर्व समुदाय संघटक यांनी परिश्रम घेतले.

### अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९

# पोलीस विभागाने तपासावर असलेल्या प्रलंबित प्रकरणाचा निपटारा त्वरित करावा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

सोलापूर/प्रतिनिधी : जिल्ह्यात अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ नुसार दिनांक १ जानेवारी ते ३० सप्टेंबर २०२३ या कालावधीत शहर पोलीस ६ व ग्रामीण पोलीस ३० व त्यापूर्वीचे सात असे एकूण ४३ गुन्हे तपासासाठी प्रलंबित आहेत. तरी पोलीस विभागाने तपासावर असलेल्या प्रलंबित प्रकरणाचा निपटारा त्वरित करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर सरकारी वकील श्री. कुरुडकर, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी काटकर, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांच्यासह सर्व नगरपालिका मुख्याधिकारी सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पुढे म्हणाले की अत्याचार प्रतिबंध अधिनियमानुसार न्यायालयात दाखल असलेल्या प्रकरणापैकी एक जानेवारी २०२३ ते ३० सप्टेंबर २०२३ अखेरपर्यंत न्यायालयाने ९८ गुन्ह्यात निर्णय दिलेला आहे त्यानुसार आठ गुन्ह्यात आरोपींना शिक्षा झालेली असून पन्नास गुण्यांमध्ये आरोपी निर्देश तुटलेले आहेत. तरी या अधिनियमातील तरतुदीनुसार गुन्हे दाखल झाल्यानंतर आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे. सरकारी वकिलांनी न्यायालयाने निर्णय दिलेल्या ५८ प्रकरणाचा सूक्ष्मपणे अभ्यास करून आरोपी न्यायालयात निर्दोष का सुटतात, तपासात त्रुटी आहेत का? याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील पंधरा दिवसात सादर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. प्रारंभी समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले यांनी जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीकडे असलेल्या प्रकरणांची माहिती दिली. अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात ३६० पीडितांना ६ कोटी २० लाख ३२ हजारांचे अर्थसहाय्य थेट बँक खात्यावर देण्यात आलेले असून सन २०२३ -२४ या आर्थिक वर्षात माहे सप्टेंबर अखेरपर्यंत पीडितांची तरतूद अप्राप्त असल्याचे त्यांनी सांगितले.

### *अत्याचार प्रतिबंध अधिनियम नुसार न्यायालयात आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण असण्याबाबत सरकारी वकील यांनी सविस्तर अहवाल द्यावा

*ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या, जिल्ह्यातील गावांची जातीवाचक नावे बदलणे व सफाई कर्मचारी बाबत बैठक-यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ज्येष्ठ नागरिक यांच्या समस्येच्या अनुषंगाने घेतलेल्या बैठकीत जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ज्येष्ठ नागरिकांसाठी ३०० गावांमध्ये जे विरंगुळा केंद्र सुरू आहेत त्या विरंगुळा केंद्रात शासन निर्णयाप्रमाणे सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत का याबाबतचा सविस्तर अहवाल पुढील पंधरा दिवसात संबंधित गटविकास अधिकारी यांच्याकडून प्राप्त करून घ्यावा अशा सूचना जिल्हा परिषदेच्या जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना देण्यात आल्या. तर जिल्ह्यातील जातीवाचक गावांची, गल्लयांची व रस्त्यांची नावे बदलण्याच्या अनुषंगाने ११ डिसेंबर २०२० च्या शासन निर्णयाप्रमाणे ग्रामीण भागातील १२९९ गावांची, गल्ली व रस्त्यांची नावे बदलणे, सोलापूर महापालिका क्षेत्रातील ४८ गल्ली, वस्त्याची जातिवाचक नावे बदलणे व नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील ७९ गल्ली व रस्त्यांची जातीवाचक नावे बदलण्याबाबतचे प्रस्ताव यापूर्वीच शासनाला सादर केलेले आहेत. तरी ही नावे बदलण्याबाबत त्वरित कार्यवाही होण्यासाठी समाज कल्याण विभागाच्या सचिवाकडे पाठपुरावा करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिल्या. तसेच सफाई कर्मचारी व त्यांच्या पाल्यांना आवश्यक असलेल्या शासकीय योजनांचा लाभ संबंधित विभागाने तात्काळ मिळवून देण्याबाबत चे निर्देशही त्यांनी दिले.

# कल्याणमंध्ये बळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन

ठाणे/मिलिंद जाधव : कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा ठाणे व ओबीसी संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने राजमाता जिजाऊ कलामंच प्रस्तूत मनोरंजनातून प्रबोधन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम बळी पहाट यावर्षी १४ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळीं ठीक ६.३० वाजता अत्रे रंगमंदिर कल्याण येथे सादर होत आहे. सम्राट बळीराजाचा खरा इतिहास, शेतकरी, कामकरी वर्ग यांची खरी संस्कृती, या संस्कृतीशी निगडित असलेले गाणे, धमाल नृत्य यांची सांगड घालून तयार केलेला, प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलेला हा कार्यक्रम राजमाता जिजाऊ कलामंच सलग तिसऱ्या वर्षी नव्या पद्धतीने सादर करत आहेत, तरी या कार्यक्रमासाठी सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा ठाणे व ओबीसी संघर्ष समिती मार्फत यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लुंबिनी बुद्ध विहाराच्या वतीने जेऊरवाडी येथील नूतन सदस्याचां सत्कार



अक्कलकोट/ गौतम बाळशंकरः हन्नुर येथील लुंबिनी बुद्ध विहाराच्या वतीने जेऊरवाडी ग्रामपंचायतच्या नुतन सदस्यांचा सत्कार करण्यात आला. नुतन सदस्य विजय भालेराव,रोहित भालेराव, वृषाली भालेराव या नुतन सदस्यांचा सत्कार माजी सरपंच कोंडीबा सोनकांबळे, पत्रकार ग्राम पंचायत सदस्य गौतम बाळशंकर यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी गोगावचे उपसरपंच पत्रकार कमलाकर सोनकांबळे यांनी नुतन सदस्याना शुभेच्छा दिल्या. हन्नुर चे माजी सरपंच नैलेश बाळशंकर यांच्यासह जेऊरवाडी येथील कार्यकर्ते बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ९५९ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर : मदत पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील

मुंबई : राज्यातील दुष्काळ स्थिती जाहीर केलेल्या ४० तालुक्यांच्या व्यतिरिक्त उर्वरित ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेल्या ९५९ महसुली मंडळांमध्ये दुष्काळ सदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. या महसुली मंडळातील दुष्काळग्रस्तांना देण्यात येणाऱ्या सर्व सवलती लागू होणार असल्याचे मदत, पुनवर्सन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील यांनी जाहीर केले.

मंत्रालयातील वॉर रुम येथे मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपसमितीचे सदस्य तथा सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, रोजगार हमी योजना मंत्री संदिपान भुमरे, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, पशुसंवर्धन विभागाचे सचिव तुकाराम मुंडे, कृषी विभागाचे सचिव सुनील चव्हाण, वित्त विभागाचे सहसचिव वि.र.दहिफळे, पाणीपुरवठा विभागाच्या उपसचिव वर्षा देशमुख,मदत व पुनर्वसन विभागाचे उपसचिव संजय धारुरकर, जलसपंदा विभागाचे सहसचिव संजय टाटू यावेळी उपस्थित होते.

मंत्री श्री.पाटील म्हणाले की, केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. मात्र, राज्यातील उर्वरीत तालुक्यातील काही मंडळांमध्ये असलेली पर्जन्यमानाची कमी लक्षात घेता ७५ टक्क्यांपेक्षा कमी आणि ७५० मिमी पेक्षा कमी पाऊस पडलेला आहे, असा निकष लक्षात घेऊन १७८ तालुक्यातील ९५९ महसुली मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. दुष्काळग्रस्तांना देण्यात येणाऱ्या जमीन महसूलात घट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीज बिलात ३३.५ टक्के सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शुल्कात माफी,



रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात काही प्रमाणात शिथिलता,आवश्यक तिथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकरचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेती पंपांची वीज जोडणी खंडित न करणे या सवलती ९५९ महसुली मंडळामध्ये देण्यात येतील, असेही मंत्री श्री.पाटील म्हणाले.

राज्यात पशुधनाकरिता चारा निर्माण होण्याकरिता १ लाख लाभार्थ्यी शेतक-यांना ५ लाख टन मूरघास निर्मिती करून वितरण करण्यात येणार आहे. यासाठी येणा-या ३० कोटी रुपयांच्या खर्चाला यावेळी मान्यता देण्यात आली. जेणेकरून राज्यातील पशुपालकांचे आर्थिक नुकसान होणार नाही. तसेच जून २०१९ मध्ये जळगाव जिल्ह्यातील भडगाव, रावेर, भुसावळ, चोपडा, यावल, जळगाव व पाचोरा या तालुक्यातील शेत पिकांच्या नुकसानीकरिता मदत जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. नव्याने अस्तित्वात आलेली महसुली मंडळे जिथे पर्जन्यमापक बसविले नाहीत, तसेच बिघडलेली पर्जन्यमापके असलेली महसुली मंडळे येथून देखील नव्याने माहिती मागवावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

१७८ तालुक्यातील ९५९ सर्कलमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती म्हणून जाहीर

अकोला जिल्ह्यातील ७ तालुक्यामधील ५० मंडळ, अमरावती जिल्ह्यातील १३ तालुक्यामधील ७३ मंडळ, बुलढाणा जिल्ह्यातील ११ तालुक्यामधील ७० मंडळ, वाशीम जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ३१ मंडळ, यवतमाळ जिल्ह्यातील ५ तालुक्यामधील ९ मंडळ, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७ तालुक्यामधील ५० मंडळ, बीड जिल्ह्यातील ८ तालुक्यातील ५२ मंडळ, हिंगोली जिल्ह्यातील ५ तालुक्यातील १३ मंडळ, जालना जिल्ह्यातील ३ तालुक्यामधील १७ मंडळ, लातूर जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ४५ मंडळ, नांदेड जिल्ह्यातील ८ तालुक्यातील २३ मंडळ, धाराशीव जिल्ह्यातील ५ तालुक्यातील २८ मंडळ, परभणी जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ३८ मंडळ, नागपूर जिल्ह्यातील ४ तालुक्यातील ५ मंडळ, वर्धा जिल्ह्यातील ४ तालुक्यातील ६ मंडळ, अहमदनगर जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ९६ मंडळ, धुळे जिल्ह्यातील ३ तालुक्यातील २८ मंडळ, जळगाव जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ६७ मंडळ, नंदुरबार जिल्ह्यातील ३ तालुक्यातील १३ मंडळ, नाशिक जिल्ह्यातील ८ तालुक्यातील ४६ मंडळ, कोल्हापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यातील २० मंडळ, पुणे जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ३१ मंडळ, सांगली जिल्ह्यातील ६ तालुक्यातील ३७ मंडळ, सातारा जिल्ह्यातील ८ तालुक्यामधील ६५ मंडळ, सोलापूर जिल्ह्यातील ७ तालुक्यामधील ४६ मंडळ असे एकूण १७८ तालुक्यातील ९५९ मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती म्हणून जाहीर करण्यात आले आहेत.

# वागदरी ग्रामपंचायत उपसरपंचपदी पंकज सुतार यांचे बिनविरोध निवड

अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी ग्रामपंचायत येथील उपसरपंच लक्ष्मीबाई पोमाजी यांनी राजानामा दिल्यामुळे रिक्त पदासाठी कार्याध्यक्ष सरपंच श्रीकांत भैरामडगी यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया घेण्यात आले यावेळी विस्तार अधिकारी संजय पाटील यांच्या मार्गदरशनाखाली ग्रामविकास अधिकारी राजकुमार कणमुसे यांनी सदर निवडीचे कामकाज पार पाडले. ग्रामपंचायत वागदरी येथे उपसरपंच निवडीचे कार्यक्रम घेण्यात आले उपसरपंच पदासाठी पंकज मलकप्पा सुतार हे एकमेव अर्ज आल्यामुळे उपसरपंचपदी पंकज सुतार यांची निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर कार्याध्यक्ष श्रीकांत भैरामडगी यांनी केले यावेळी ग्रामपंचायत सदस्य शिवानंद घोळसगाव, अंबुबाई मंगाणे, श्रीकांत इंडे, राजकुमार हुग्गे, हनिफ मुल्ला, लक्ष्मीबाई पोमाजी, कावेरी नंजुडे, सिंधूबाई सोनकवडे, शारदाबाई रोंटे , सुजाता घुले – पोमाजी, या सदस्याच्या उपस्थिती निवड प्रक्रिया घेण्यात आले.




निवडी नंतर माजी सरपंच रवि वरनाळे, तंटा मुक्त समिती अध्यक्ष शरणप्पा मंगाणे, लक्ष्मण भैरामडगी शिवराज ( मंत्री ) पोमाजी सुधीर सोनकवडे, लक्ष्मण मंगाणे, प्रकाश पोमाजी, घळाय्या मठपती, मुतू मंगाणे, रवी पोमाजी, विकास नंजुडे , रेवणपा सलगरे, इसराल नदाफ, श्रीसेल पोमाजी, मलकप्पा सुतार, यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिले सत्कार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव सोनकवडे यांनी केले.

# सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच वतीने उपसरपंच पंकज सुतार यांचा सत्कार



अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी ग्रामपंचायत उपसरपंचपदी पंकज मलकप्पा सुतार यांचे बिनविरोध निवड झाल्याबद्दल सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच अक्कलकोट तालुक्याच्या वतीने जंगी सत्कार मोठ्या उत्साहात करण्यात आले यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस बसवराज शेळके यांच्या हस्ते उपसरपंच पंकज सुतार यांचा सत्कार करण्यात आले यावेळी सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच तालुकाध्यक्ष श्याम बाबर, किरनळी सरपंच सतीश कणमुसे, गोगांव उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, महादेव सोनकवडे, यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते यावेळी महादेव सोनकवडे, कमलाकर सोनकांबळे, बसवराज शेळके, शाम बाबर यांनी मनोगतपर शुभेच्छा दिले यावेळी बोलताना उपसरपंच सुतार म्हणाले की गावाच्या विकासासाठी कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता काम करणार आहे, शासकीय विविध योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पाचवण्याचे प्रयत्न करणार आहे गावाच्या विकास कामासाठी सर्वांनी सहकार्य करावे यावेळी मकबूल कणमुसे, दत्ता व्हदलुरे, मुत्तू चीमनगिरी, फिरोज नदाफ, मंजू पोमाजी, अनिल पूरंत, कलेणी सुतार, काळप्पा सुतार, शिवाजी संपोरे, अस्लम मुल्ला, विजयकुमार गायकवाड आदी उपस्थित होते

# शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ३ सरपंचासह ३९ सदस्याच्या जोरदार मुसंडी

अक्कलकोट/प्रतिनिधीः जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ व जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा संपर्कप्रमुख उमेश सारंग व उपजिल्हाप्रमुख सुनील कटारे यांच्या सल्ल्यानुसार तालुकाप्रमुख आनंद बुक्कांनुरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुका संघटक राजू गुनापुरे व उपविभाग प्रमुख श्रीशैल आहेरवाडी व युवासेना तालुका प्रमुख विश्र्वनाथ कोगनुरे व शिवसैनिक तम्मा हांगर्गी बसवराज बगले यांच्या अथक परिश्रमाने केगाव खु व केगावं बु या दोन्ही ग्रामपंचायतमध्ये श्रीशैल आहेरवाडी व प्रभावती बसवराज बगले असे दोन सरपंचसह दोन्ही ग्रामपंचायत मधून बारा सदस्य निवडून आले तसेच घुग्रेगाव येथील शिवसैनिकाची आई श्री. सुमन गुरव सरपंचपदी निवडून आले. तसेच तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीमध्ये एकूण ३९ सदस्य शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निवडून आले आहेत पक्षाच्या वतीने निवडून आलेल्या सदस्याच्या अभिनंदन तालुक्यातील निवडून दिलेल्या सर्व मतदारांचे अक्कलकोट शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वतीने तालुका प्रमुख मा. आनंद बुक्कानुरे व उपजिल्हा प्रमुख मा. सूनील कटारे यांनी आभार व्यक्त केले.



# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाची आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधी : ब्रिटिश वसाहतवादी कालखंडातील साहित्याचा आपल्या साहित्यावरती प्रभाव असून या मानसिकतेतून आपण बाहेर पडले पाहिजे. तरच आपली मूळची संस्कृती, भाषा व ओळख यातून आपणास आपले साहित्य पुढे आणता येईल. मानवता व स्त्री–पुरुष समानता हे विचार जागतिक साहित्यातून पुढे आले पाहिजे असे प्रतिपादन यूनिवर्सिटी ऑफ केलानिया श्रीलंका येथील इंग्रजी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. शशिकला अस्सेला यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात रुसा काम्पोनंट आठ अंतर्गत इंग्रजी विभाग व सोलापूर इंग्लिश टीचर्स ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'वर्ल्ड लिटरेचर्स अँड कल्चरल स्टडीज' या विषयावरती एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय विद्यापीठ धारवाड, कर्नाटक येथील इंग्रजी विभागाचे प्रोफेसर प्रा. बसवराज दोनुर हे होते. या परिषदेत त्रिभुवन युनिव्हर्सिटी, काठमांडू नेपाळ येथील लिटररी असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी प्रो. डॉ. खूम प्रसाद शर्मा यांनी बीजभाषण केले.

प्रोफेसर डॉ. शशिकला अस्सेला पुढे म्हणाल्या की, जागतिक साहित्य समृद्ध करण्यामध्ये दक्षिण आशियाई लेखकांचे मोलाचे योगदान असून त्यांनी आपल्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व साहित्याच्या माध्यमातून जगाला पटवून दिले. अध्यक्षीय भाषणात प्रोफेसर प्रा. बसवराज दोनुर म्हणाले की, प्रादेशिक साहित्य व संत साहित्य यांचे जागतिक साहित्यात महत्त्वाचे स्थान असून ते समाजाला दिशा देणारे आहे. त्यामुळे साहित्य, समाज व संस्कृती यांचा अभ्यास करणे ही काळाची गरज आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह व शाल देवून स्वागत केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख तथा परिषदेचे निमंत्रक प्रा. डॉ. समाधान माने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय समन्वयक प्रा. डॉ. धनंजय साठे यांनी करून दिला.



परिषदेच्या दुसऱ्या व तिसऱ्या सत्रामध्ये अनुक्रमे डॉ. शशिकला अस्सेला श्रीलंका व डॉ. जय सिंग, इंग्लिश अँड फॉरेन लँग्वेजेस युनिव्हर्सिटी, हैदराबाद यांनी तज्ञ व्याख्याते म्हणून व्याख्यान दिले. तर या दोन्ही सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शरद गाडेकर व प्रा. डॉ. विष्णू पाटील हे होते. चौथ्या सत्रामध्ये देशभरातून अनेक प्राध्यापक व संशोधकांनी आपल्या शोधनिबंधाचे 'जागतिक साहित्य व सांस्कृतिक अभ्यास' या विषयावरती ऑनलाईन व ऑफलाइन पद्धतीने सादरीकरण केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी अनुक्रमे सोलापूर इंग्लिश टीचर्स ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. अशोक कदम व सेक्रेटरी प्रा. डॉ. सचिन लोंढे हे होते. या परिषदेत 'पद्मकन्या मल्टिपल कॅम्पस, त्रिभुवन युनिव्हर्सिटी काठमांडू, नेपाळ' व इंग्रजी विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

ही परिषद यशस्वी करण्यासाठी ऑर्गनायझिंग सेक्रेटरी प्रा. धनंजय वाघदरे, रुसा समिती समन्वयक प्रा. योगेश पाठक, प्रा. डॉ. चंद्रकांत काळे, कार्यालयीन प्रमुख प्रभाकर पारधी, प्रा. सुहास शिंदे, प्रा. कुबेर गायकवाड, प्रा. सोमनाथ व्यवहारे, प्रा. प्रवीण शिंदे पाटील, प्रा. सैफअली विजापुरे, प्रा. श्रीधर रेवजे, प्रा. राजेंद्र मोरे, अभिजित जाधव, सुरेश मोहिते, आदी शिक्षक शिक्षकेतर सेवक यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कुबेर गायकवाड यांनी केले.



# पडघा येथे चक्रीवादळ आपत्ती रंगीत तालीम संपन्न

ठाणे : चक्रीवादळ अनुषंगिक आपत्ती विषयाची चाचणी तथा सामूहिक राज्यस्तरीय प्रात्यक्षिक आयोजक ग्राज्य आपत्ती व्यवस्थापण प्राधिकरण महाराष्ट्र राज्य मार्गदर्शक राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापण प्राधिकरण, नवी दिल्ली आणि मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने चक्रीवादळ आपत्ती रंगीत तालिमीसाठी ठाणे जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष अशोक शिनगारे, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुदाम परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली चक्रीवादळ आपत्ती रंगीत तालीम भिवंडी तालुकयातील पडघा ,एम. ई.सी. बी ग्राउंड येथे घेण्यात आली.

# व्हॉट्सअप समुह माध्यमामधून सामाजिक बांधिलकी जोपासत माजी विध्यार्थांकडून शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

भातसानगर/प्रफुल्ल शेवाळे :सोशल मीडिया च्या माध्यमातून आपल्याच शाळेतील विद्यार्थ्यांना आपल्याच शिक्षकांच्या स्मृती प्रित्यर्थ शिष्यवृत्ती देण्याचा, आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा अनोखा उपक्रम पहावयास मिळाला आहे...

मुंबईला ला पाणी पुरवठा करणारे भातसा धरण आणि याच ठिकाणी वसलेलं प्रकल्प विदयालय... या शाळेची स्थापना १९७८ ला झाली.. अनेक विद्यार्थी या शाळेने घडवले.. अनेक आदर्श शिक्षकांचा परिस स्पर्श या शाळेला लाभला.. यातच एक आदर्श शिक्षक संदांनशीव सर या शाळेला लाभले.... या सरांनी अनेक गोर गरीब विदयार्थ्यांना व्यक्तीगत मदत केली... शाळेप्रती आपली बहुमोल शिक्षकी सेवा दिली आणि या शिक्षकानं २०२१ साली या जगाचा कायमचा निरोप घेतला.. अशा आदर्श शिक्षकांच्या स्मृती प्रित्यर्थ याच शाळेतील १९९३–९४ बॅच विद्यार्थ्यांनी व्हाट्सअप च्या माध्यमातून एकत्र येत एक शिष्यवृती योजना चालू केली.. या व्हाट्सअप समूहातील मित्रांनी दर महिन्यला एक ठराविक रक्कम जमा करत एक सामाजिक बांधिलकी म्हणून सदर शिष्यवृत्ती योजना चालु केली आहे.. शाळेतून दहावी उत्तीर्ण झालेले होतकरू ५ विध्यार्थी याचे लाभार्थी होत असतात.. या समूहाने आतापर्यंत कोरोना काळात, तसेच समाजातील विविध गरजू व्यक्तींना आर्थिक मदत देऊ केली आहे... या शिष्यवृत्ती देणे करिता समूहातील हरिश्र्चंद्र अधिकारी... सुनिल दाभाडे, प्रशांत चन्ने, युवराज गोरें, प्रफुल्ल शेवाळे आदी माजी विद्यार्थ्यांनी स्वतः त्या त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी जाऊन शिष्यवृत्ती व प्रशस्तीपत्रक बहाल केले.

सदर लाभार्थी विद्यार्थी वर्गाच्या पालकांच्या चेहऱ्यावर स्व. संदांनशीव सर यांच्या प्रती असणारी आदरयुक्त भावना आणि



माजी विद्यार्थी बद्दल चे अनोखे कौतुक दिसून येत होते. सामाजिक बांधिलकी जोपासत आम्ही येणाऱ्या आगामी काळात छोटे मोठे उपक्रम राबवत राहणार आहोत यात बिलकुल खंड पडणार नाही... आमच्या ९३–९४ बॅच च्या संपूर्ण विद्यार्थी मित्रांचा विश्र्वास यामुळे असे उपक्रम नक्कीच भविष्यात आणखीन मोठया प्रमाणात उदयास येतील असे प्रशांत चन्ने,सुनील दाभाडे यांनी म्हटलं आहे.. आपल्या पुढील पिढीच्या विद्यार्थी वर्गाने गुरुजनांचा आदर्श वारसा जपत भविष्यात मार्गक्रमण करत राहण्याचा सल्ला... हरिश्र्चंद्र अधिकारी सर यांनी लाभार्थी विद्यार्थ्यांना दिला आहे. प्रकल्प विद्यालयातील मुख्यध्यापक शिवाजी पाटील सर आणि विद्यमान शिक्षक वर्गाने आपल्या माजी विद्यार्थ्यांना एक कौतुकाची थाप या निमित्ताने देऊ केली आहे..

# बुद्धांच्या विचारांचे डॉ. आंबेडकरांसारखे तत्वज्ञानी बना : मुन्नाभाई नंदागवळी

लाखांदूर/प्रतिनिधीः तथागत बुद्ध यांनी नवा मानव मुक्तीच्या कल्याणासाठी धम्म निर्माण करुन रुजविला. त्याचे प्रचार प्रसार करुन धम्माचे प्रवर्तन केले. धम्मासह विचार आणि तत्वज्ञान सांगितले. यालाच हजारो वर्षांनंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माचे महत्त्व लक्षात घेऊन विजयादशमीला नागांच्या नागभूमीत धम्मदीक्षा सोहळा पार पाडला. म्हणूनच बुद्धांच्या विचारांचे डॉ आंबेडकरांसारखे तत्वज्ञानी बना. असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. तते दिघोरीमोठी येथे कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी विचार मंचावर उद्घाटक म्हणून जिल्हा परिषद सदस्य अविनाश ब्राम्हणकर, मधूकर अंबादे यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच सुनिता साळवे, कवी खेमचंद रंगारी, पंचायत समिती सभापती संजना खरवडे, माधूरी हुकरे, माजी जिल्हा परिषद सदस्य व्यंकट मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते हंसराज रामटेके, धम्मदीप मेश्राम, राजोलीचे संजय कांबळे, श्री वानखेडे, सो. ढोके आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रसंगी साकेत बौद्ध विहार समिती व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती विहारात तथागत बुद्धांना अभिवादन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला माळ अर्पण करण्यात आले व अभिवादन केले गेले. सदर कार्यक्रम दिघोरीमोठी येथे सायंकाळी ०६.०० वाजता पार पडला. व्यंकट मेश्राम, के ए रंगारी, संजय कांबळे, अविनाश ब्राम्हणकर यांनी मार्गदर्शन केले. पूढे बोलताना प्रा. नंदागवळी म्हणाले– बौद्ध धम्मात चर आर्य सत्य, आठ अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता, २२ प्रतिज्ञा व अष्ठशिलाचे पालन करावे. नागभूमीत रक्तविहीत क्रांती डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ ला पाच लाख लोकांना धम्मदीक्षा दिली. धम्म अनुशरण करा म्हणजे लवकर समजेल. सामाजिक सलोखा जोपासत सामुहिक भोजनदान करण्यात आले. रात्री भीमगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सुत्रसंचालन प्यारेलाल लोणारे यांनी केले, तर प्रास्ताविक व आभार अध्यक्ष चंद्रशेखर ढोके यांनी केले. यशस्वीतेसाठी सचिव सुरज लोणारे, फूलचंद राऊत, शैलेश साखरे, सुनिल नंदागवळी, काशिनाथ चौधरी, दयाराम नंदागवळी, निर्मला वैद्य यांनी परिश्रम घेतले.

